// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र शासन

GOVERNMENT OF MAHARASHTRA

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

# Maharashtra State Commission for Women

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक :- ममआ-२०२६/नवरात्र/का-६/659
दिनांक :- ०६/१०/२०२६

## नोटीस

विषय - नवरात्रोत्सव निमित्ताने समाज माध्यमे द्वारे प्रसिद्धी/जनजागृतीकरिता १० दिवस मोहिम राबविणेबाबत

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या विविध समाज माध्यम खात्यांवर जनजागृती, प्रसिद्धी करिता नवरात्रोत्सवाच्या काळात महिला सक्षमीकरणाबाबत नवी, स्वतंत्र संकल्पना (Theme) विकसित करत १० दिवस मोहिम राबविण्यात येणार आहे. यासाठी नामांकित संस्थांकडून संपुर्ण माहितीसह सीलबंद लखोटयात निविदा मागविण्यात येत आहेत.

| विषय | कालावधी |
|---|---|
| १. आयोगाची उद्दिष्टे आणि मार्गदर्शनानुसार महिला सक्षमीकरणाबाबत नवी, स्वतंत्र संकल्पना (Theme) विकसित करत त्यानुसार संशोधन, विषय मांडणी, संदेश, संहिता लेखन, व्हिज्युअल स्टोरीबोर्ड, संपादन, व्हॉईस ओवर, ग्राफिक्स, संगीत सह कृत्रिम बुद्धिमत्ताद्वारे (Artificial Intelligence - AI) निर्मित व्हिडिओ आणि छायाचित्र (Poster Graphics) तयार करणे.<br>२. नव विकसित संकल्पनेवर मुख्य संदेश आधारित संहिता तयार करणे. तसेच महिला सुरक्षा, कायदे, अधिकार, हेल्पलाइन, सरकारी योजना आणि सामाजिक विषयांवर भाष्य करणारी संहिता असावी.<br>३. कत्रिम बुद्धिमत्ताद्वारे निर्मित ३० ते ६० सेकंदाचे ५ व्हिडिओ आणि १० छायाचित्र (साईझ-पोस्टर वर्टिकल १०१८X१३५०) तयार करणे.<br>४. AI व्हिडिओचे एडिटिंग, टेक्स्ट ओव्हरले, सबटायटल्स, ट्रान्झिशन्स, व्हॉइसओव्हर आणि ऑडिओ मिक्सिंग इत्यादी तांत्रिक बाबी पुर्ण करणे.<br>५. सदर व्हिडिओ, छायाचित्रे Instagram Reels, Facebook, आणि X यांसारख्या डिजिटल माध्यमांसाठी तसेच मोबाईलद्वारे पाठविणे, पाहणेकरिता योग्य क्षमतेचे असावेत. तसेच आउट डोअर मिडिया करिता डिजिटल स्क्रीनद्वारे प्रसिद्धी करिता आवश्यक क्षमतेचे असावेत.<br>६. तयार व्हिडिओ, छायाचित्रे संहितेसह आयोगास पेन ड्राईव्हमधे तसेच गुगल लिंक द्वारे सादर करण्यात यावेत | दिनांक ११ ते २० ऑक्टोबर २०२६ |

अटी -

१. मीडिया, डिजिटल मीडिया आणि संबंधित क्षेत्रात **किमान ५ वर्षांचा अनुभव.**
२. शासकीय, स्थानिक स्वराज्य, सार्वजनिक संस्थांसोबत अनुभवास प्राधान्य.
३. महिला, बालक, आरोग्य, शिक्षण, सामाजिक न्याय यांसारख्या विषयांवरील कामाच्या अनुभवास प्राधान्य
४. संशोधन, तथ्य पडताळणी, लेखन आणि डिजिटल कंटेंट निर्मिती अनुभव
५. AI आधारित कंटेंट, व्हिडिओ एडिटिंग, मोशन ग्राफिक्स व ग्राफिक डिझाइनचा अनुभव
६. मागील २ वर्षांतील **किमान ३ संबंधित कामांची उदाहरणे** सादर करणे आवश्यक.

तरी इच्छुक असणाऱ्या दरपत्रकधारकाने आपले दरपत्रक स्वतःच्या लेटरहेडवर आयोग कार्यालयास सिलबंद लिफाफ्यात दि.८/१०/२०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत. सदर निविदेमध्ये रक्कम रुपये, G.S.T. नंबर, H.S.N. Code व लागू कर आकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी. तसेच नोटीस संदर्भाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दुपारी २.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी सबंधित कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. सदर प्रक्रियेबाबत कोणताही बदल किंवा रद्द करण्याचा पूर्ण अधिकार मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचेकडे राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

(मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने)

6/10/2026

प्रशासकीय अधिकारी

Scanned with OKEN Scanner